

संगमेश्वर बाजारपेठेत उतरणाऱ्या पायऱ्यांमध्ये विजेचा खांब, अपघाताचा धोका

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

घुडेवठार येथील एकमुखी दत्त मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव भक्तिमय वातावरणात साजरा

पान ८



रत्नागिरी • सोमवार १४ जुलै, २०२५ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० • वर्ष २१ • अंक २४३ • पाने ८ • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

# देशभरात मतदार याद्या तपासल्या जाणार

## निवडणूक आयोगाची तयारी पूर्ण

### २८ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर होणार निर्णय

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

बिहारनंतर, निवडणूक आयोग (EC) आता देशभरात स्पेशल इंटेन्सिव रिवीजन (SIR) करणार आहे. या अंतर्गत, मतदार यादीची कसून तपासणी आणि अद्ययावतीकरण केले जाते. ते ऑगस्टपासून सुरू होऊ शकते. निवडणूक आयोगाने सर्व राज्यांमध्ये आपली निवडणूक यंत्रणा सक्रिय केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने १० जुलै रोजी बिहारमध्ये स्पेशल इंटेन्सिव रिवीजन सुरू ठेवण्याची परवानगी दिल्यानंतर निवडणूक आयोगाचा हा निर्णय आला. न्यायालयाने ते घटनात्मक घोषित केले होते.




तथापि, अनेक विरोधी पक्ष आणि लोक या सुधारणांच्या विरोधात आहेत. त्यांनी याला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही दिले आहे. स्पेशल इंटेन्सिव रिवीजनमुळे पात्र नागरिक त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहतील, असा दावा केला जात आहे.

निवडणूक आयोगाच्या अधिकारानुसार, बिहार स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होणार असल्याने निवडणूक अधिकारी २८ जुलैनंतर एसआयआरवर अंतिम निर्णय घेतील. त्याचवेळी, काही राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या राज्यांमध्ये मागील एसआयआरनंतर प्रकाशित झालेल्या मतदार याद्या आधीच प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे.

२००८ ची मतदार यादी दिल्लीच्या सीईओंच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे, जेव्हा शेवटची स्पेशल इंटेन्सिव रिवीजन दिल्लीत करण्यात आली होती. उत्तराखंडमध्ये शेवटची स्पेशल इंटेन्सिव रिवीजन २००६ मध्ये करण्यात आली होती. त्यावेळची मतदार यादी राज्याच्या सीईओंच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. राज्यांमधील शेवटची स्पेशल इंटेन्सिव रिवीजन ही कट-ऑफ तारीख म्हणून काम करेल, कारण निवडणूक आयोग बिहारची २००३ ची मतदार यादी स्पेशल इंटेन्सिव रिवीजनसाठी वापरत आहे. बहुतेक राज्यांमध्ये, २००२ ते २००४ दरम्यान मतदार यादी सुधारित करण्यात आली होती.

### बिहारच्या मतदार यादीत नेपाळ आणि बांगलादेशातील लोक

बिहारमध्ये मतदार यादी पडताळणीचे काम सुरू आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांचा दावा आहे की, बिहारमध्ये मोठ्या संख्येने परदेशी नागरिक आहेत. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, 'आम्ही मतदार यादी सुधारणेसाठी घरोघरी भेटी दिल्या. या दरम्यान, आम्हाला नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारमधील लोक मोठ्या संख्येने आढळले.' निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, 'अशा लोकांची १ ऑगस्टनंतर चौकशी केली जाईल. ३० सप्टेंबर रोजी प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीत बेकायदेशीर स्थलांतरितांची नावे समाविष्ट केली जाणार नाहीत.' मतदार यादी पडताळणीचे काम २४ जून रोजी सुरू झाले आणि मतमोजणी फॉर्म सादर करण्याची अंतिम तारीख २५ जुलै २०२५ आहे. मतदार मतमोजणी फॉर्म सादर करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

# ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांच्यासह चार सदस्यांना राज्यसभेसाठी राष्ट्रपतींनी केले नियुक्त

### मास्ते, श्रृंगला आणि मीनाक्षी जैन देखील नामांकित

**मुंबई (वृत्तसंस्था) :**

राष्ट्रपतींनी राज्यसभेसाठी चार नवीन नामांकित सदस्यांची नियुक्ती केली आहे. यामध्ये ज्येष्ठ वकील आणि लोकसभा निवडणुकीत भाजपचे मुंबईतील उमेदवार उज्ज्वल निकम यांचा समावेश आहे. निकम हे अजमल कसाबसह अनेक हाय-प्रोफाइल फौजदारी खटल्यांमध्ये सरकारी वकील होते. त्यांच्याशिवाय, केरळचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मास्ते, भारताचे माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि सुप्रसिद्ध इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांनाही राज्यसभेवर नामांकित करण्यात आले आहे. या नियुक्त्या त्या जागांसाठी करण्यात आल्या आहेत, ज्या पूर्वी नामांकित सदस्यांच्या निवृत्तीमुळे रिक्त होत्या.

(पान २ वर)



### 'मला पंतप्रधान मोदींचा फोन आला म्हणाले, मराठीत बोलू की हिंदीत अन् पुढे..', उज्ज्वल निकम यांनी सांगितला खास किस्सा

ज्येष्ठ सरकारी वकील अॅउज्ज्वल निकम यांची राष्ट्रपती कोट्यातून खासदारपदी नियुक्ती झाली आहे. निकम यांच्यासह आणखी तिघांना खासदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या नियुक्तीनंतर निकम यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. खासदार म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल निकम यांनी राष्ट्रपतींसह पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्र्यांचे आभार मानले. तसेच लोकसभेच्या निवडणुकीत आलेले अनुभवही त्यांनी यावेळी बोलून दाखवले. पीएम मोदींनी मला फोन करून माझ्याशी मराठी भाषेतच संवाद साधला, असे उज्ज्वल निकम यावेळी म्हणाले.

(पान २ वर)

## वेचक

### तुळजाभवानी मंदिर आता फक्त १९ तास खुलं

**तुळजापूर :** महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेले श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर येथील मंदिर म्हणजेच संपूर्ण राज्याच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. मंदिर प्रशासनाने उघडण्याच्या वेळेत मोठा बदल करत गर्दीच्या दिवशी मंदिर केवळ १९ तासच खुले ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, जो याआधी २२ तास सुरू असायचा. या नव्या निर्णयामुळे विशेषतः गर्दीच्या दिवशी मंदिर दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार रविवार, मंगळवार, शुक्रवार आणि पौर्णिमेच्या दिवशी मंदिर पहाटे १ वाजता नव्हे, तर ४ वाजता उघडण्यात येणार आहे. तसेच इतर साध्या दिवशी म्हणजे सोमवार, बुधवार, गुरुवार आणि शनिवार या दिवशी मंदिर सकाळी ६ वाजता उघडेल.

### राज्यातील सर्व परमिट रूम, बार आज बंद

**मुंबई (प्रतिनिधी) :** राज्य सरकारच्या कर धोरणांविरुद्ध इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन (आहार ) या संघटनेने सोमवारी बंद पुकारला आहे. त्यामुळे राज्यातील सर्व परमिट रूम आणि मद्यपान विक्री करणारे हॉटेल-रेस्टॉरंट बार पूर्णपणे बंद राहणार आहेत. या बंदचा राज्याच्या महसुलावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. सरकारने काही दिवसांपूर्वी दारूवरील व्हॅट दुप्पट केला आहे. त्यामुळे हॉटेल आणि बार उद्योगावरील आर्थिक भार वाढला आहे. त्याचबरोबर परवाना शुल्कात १५% आणि उत्पादन शुल्कात ६०% वाढ करण्यात आली असल्याने व्यापाऱ्यांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बंदची घोषणा आहार संघटनेकडून करण्यात आली आहे. ही करवाढ

(पान २ वर)

# डिझेलने भरलेल्या मालगाडीच्या डब्यात स्फोट

## बॉम्बस्फोटासारखी जमीन हादरली, अवघ्या पंचक्रोशीत थरकाप



**तिरुवल्लूर (वृत्तसंस्था) :**

तामिळनाडूच्या तिरुवल्लूर जिल्ह्यात एक मोठा रेल्वे अपघात टळला. डिझेलने भरलेल्या मालगाडीच्या चार डब्यांना अचानक आग लागली. ही ट्रेन मनालीहून तिरुपतीला जात होती आणि वाटेत तिरुवल्लूरजवळ हा अपघात झाला. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. आग लागल्यानंतर, चारही डब्यांमधून आगीच्या ज्वाळा आकाशात दिसू लागल्या आणि आग वेगाने पसरू लागली. स्थानिक लोकांनी तत्काळ अग्निशमन दल आणि रेल्वे अधिकाऱ्यांना याची माहिती दिली. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि खूप प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली. हा अपघात भीषण बॉम्बस्फोटासारखा भासत होता. या अपघातानंतर जमिनीला हादरे बसले.

**चेन्नईच्या अनेक गाड्यांचे मार्ग बदलले**

रेल्वे अधिकाऱ्यांच्या प्रसंगावधानामुळे उर्वरित डबे वेळेत वेगळे करण्यात आले, ज्यामुळे मोठी दुर्घटना टळली. जर आग संपूर्ण ट्रेनमध्ये पसरली असती तर मोठे नुकसान होऊ शकले असते, कारण ट्रेनमध्ये ज्वलनशील पदार्थ म्हणजेच डिझेल भरलेले होते. या घटनेनंतर, रेल्वेने सावधगिरी बाळगत चेन्नई मार्गावरील अनेक गाड्या थांबवल्या किंवा त्यांचा मार्ग बदलण्यात आला. यामुळे प्रवाशांना काही काळ त्रास सहन करावा लागला. तथापि, आता परिस्थिती सामान्य होऊ लागली आहे आणि गाड्यांचे संचालन हळूहळू सुरू होत आहे. रेल्वे प्रशासनाने या अपघाताची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, आगीचे कारण तांत्रिक बिघाड किंवा उष्णतेमुळे असू शकते, परंतु संपूर्ण सत्य चौकशीनंतरच बाहेर येईल. अपघातात कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाली नाही ही दिलासादायक बाब आहे. घटनास्थळी उपस्थित अधिकाऱ्यांनी परिस्थिती अतिशय चांगल्या प्रकारे

(पान २ वर)

# दोन दुचाकींच्या धडकेत रत्नागिरी परटवणे येथील तरुणाचा मृत्यू

## लांजा आयटीआय समोरील घटना

**लांजा (प्रतिनिधी)**

दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका स्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावर लांजा शहरातील आयटीआय समोर झाला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवार १२ जुलै रात्री ८.४५ वाजण्याच्या सुमारास शैलेश शिवराम जाधव (वय ४५, रा.तोणदे बौद्धवाडी व सध्या रा.परटवणे अशोक नगर, ता.जि.रत्नागिरी) हे त्यांच्या मालकीची पॅशन प्रो दुचाकी क्रमांक (एम.एच.०८.एटी.८६७१) घेऊन तोणदे ते लांजा असा प्रवास करत होते. दरम्यान, लांजा शहरातील आयटीआय येथून ते प्रवास करत असताना समोरून येणारा दुचाकीस्वार आशिष संदीप घडशी (वय २२, रा.कुर्णे घडशीवाडी, ता.लांजा, जि.रत्नागिरी) याने आपल्या ताब्यातील ॲक्टिव्हा दुचाकी क्रमांक (एम.एच.०८ एडब्ल्यू ००९१) चालवत येऊन शैलेश जाधव यांना धडक दिली.

अपघातानंतर शैलेश जाधव हे रस्त्यावर पडले होते. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती मिळताच लांजा पोलीस तत्काळ त्या ठिकाणी दाखल झाले आणि गंभीर जखमी शैलेश जाधव यांना रुग्णवाहिकेने लांजा ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. मात्र येथील वैद्यकीय अधिकारी यांनी शैलेश जाधव यांना तपासून मृत घोषित केले. या अपघातात आशिष घडशी हा किरकोळ जखमी झाला आहे.

दरम्यान, आपल्या ताब्यातील दुचाकी हयगयीने, वेगाने तसेच रस्त्याच्या चुकीच्या बाजूने चालवत शैलेश जाधव याला समोरून धडक

(पान २ वर)

### इस्रयली हल्ल्यात इराणचे राष्ट्रपती जखमी

**तेहरान :** गेल्या महिन्यात इराण आणि इस्रायलमध्ये १२ दिवसांचे युद्ध झाले. या काळात १६ जून रोजी इस्रायली हल्ल्यात इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान जखमी झाले. इराणी वृत्तसंस्था फार्सने ही माहिती दिली आहे.

अहवालानुसार, इस्रायलने १६ जून रोजी तेहरानच्या पश्चिम भागातील एका इमारतीवर ६ क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. त्यावेळी इमारतीत देशाच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा मंत्रिमंडळाची बैठक सुरू होती. त्यांच्यासोबत इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघेर गालिबाफ,

(पान २ वर)

# वाढवण बंदर येथे कोकणातील तरुणांसाठी रोजगाराची नवी दालने

### पहिल्या टप्प्यात ५ ते ७ हजार नोकऱ्या उपलब्ध होणार

### ना. नितेश राणे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**कणकवली (प्रतिनिधी) :**



पालघर जिल्ह्यात होत असलेल्या वाढवण बंदराचा फायदा संपूर्ण कोकणलाही होणार आहे. पहिल्या टप्प्यात ५ ते ७ हजार नोकऱ्या उपलब्ध होतील. त्यासाठी ज्या जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे त्यात सिंधुदुर्गचा समावेश आहे. वाढवण बंदरात निर्माण होणाऱ्या रोजगारासाठी ट्रेनिंग सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आयटीआयमध्ये दिले जाणार आहे. या ट्रेनिंगसाठी राज्य सरकारने १२० कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे साहजिकच सिंधुदुर्गातील युवांच्या हाताला रोजगार मिळणार आहे, असा विश्वास मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा पालकमंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, महायुतीच्या राज्य सरकारला दीडशे दिवस पूर्ण होत असतानाच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तरुण-तरुणींना रोजगाराची नवीन

(पान २ वर)

# संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला अक्कलकोटमध्ये काळे फासले

**सोलापूर (प्रतिनिधी) :**

छत्रपती संभाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख आणि श्री स्वामी समर्थ यांचा अनादर केल्याच्या निषेधार्थ शिवधर्म फाऊंडेशनच्यावतीने रविवारी अक्कलकोट येथे एका नागरी सत्कार आणि मानपत्र कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आलेले संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या अंगावर काळी शाई टाकून त्यांच्या तोंडाला काळे फासण्यात आल्याचा प्रकार घडला.

प्रवीण गायकवाड यांना त्यांच्या गाडीतून बाहेर ओढून अंगावर जाण्याचा प्रकार घडला. गायकवाड यांच्या निषेधार्थ शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. गायकवाड यांनी धर्मवीर संभाजी महाराज यांचा अवमान करत, आपल्या संघटनेला संभाजी ब्रिगेड असे एकेरी नाव धारण केले होते. संपूर्ण महाराष्ट्रात प्रवीण गायकवाड यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ आंदोलने सुरू आहेत.

(पान २ वर)

# न्याय सहाय्यक प्रयोगशाळा बळकट करण्यासाठी लोकाभिमुख, ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### महाराष्ट्रात देशातील सर्वोत्तम सायबर न्याय सहाय्यक प्रयोगशाळा

**नागपूर (वृत्तसंस्था) :**

महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्याय सहाय्यक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था



(पान २ वर)

# भारतीय लष्कराचा म्यानमार सीमेवर हल्ला; बंदी घातलेल्या उल्फाचा दावा

### भारताच्या संरक्षण दलाच्या प्रवक्त्यांनी या घटनेबाबत कोणतीही माहिती नसल्याचे केले स्पष्ट

**नवी दिल्ली :**

भारतीय लष्कराने म्यानमार सीमेवरील त्यांच्या छावण्यांवर ड्रोन हल्ले केले, असा दावा बंदी घातलेल्या दहशतवादी गट उल्फा (आय)ने रविवारी केला. मात्र, सशस्त्र दलांकडून या घटनेची पुष्टी झालेली नाही.



उल्फा (आय)ने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, पहाटे अनेक छावण्यांवर ड्रोनने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात बंदी घातलेल्या संघटनेचा एक वरिष्ठ नेता

(पान २ वर)

# एलॉन मस्कची 'टेस्ला' उद्यापासून भारतीय बाजारपेठेत

**मुंबई :**

टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांची अमेरिकन कंपनी 'टेस्ला'चा आता भारतात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमेरिकेचे बदललेले व्यापरी धोरण, समीकरण आणि आयात शुल्काचा फटका भारतासह जगातील सर्वच देशांना बसला आहे. त्यात भारतात टेस्लाचा होत असलेला प्रवेश ही फार मोठी सकारात्मक घडामोड मानली जात आहे.



येत्या मंगळवारी मुंबईत टेस्लाचे भारतातील पहिले शोरुम सुरू होत आहे. या शोरुममध्ये ग्राहकांना टेस्लाच्या दमदार इलेक्ट्रिक कार जवळून पाहता येतील. तसेच या आलिशान कारची टेस्ट ड्राईव्हही याच आठवड्यापासून ग्राहकांकरता उपलब्ध होईल. या शोरूममध्ये ग्राहकांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी अनेक एआय फीचर्ससुद्धा उपलब्ध करण्यात आले आहेत. इंटरॲक्टिव्ह स्क्रीन आणि

(पान २ वर)

# रेल्वे प्रवाशांवर आता कॅमेऱ्यांची करडी नजर

### रेल्वे इंजिन, डब्यांमध्ये बसवणार सीसीटीव्ही कॅमेरे

### संशयास्पद हालचाली ओळखण्यासाठी एआयचा वापर

### प्रवाशांच्या सुरक्षेसाठी भारतीय रेल्वेचा मोठा निर्णय!

**नवी दिल्ली(वृत्तसंस्था) :**

प्रवाशांची सुरक्षितता अधिक मजबूत करण्यासाठी भारतीय रेल्वेने गाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत, देशभरातील सुमारे ७४,००० प्रवासी कोच आणि १५,००० लोकोमोटिव्ह इंजिनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. प्रत्येक कोचमध्ये चार कॅमेरे बसवले जातील, तर प्रत्येक लोकोमोटिव्हमध्ये सहा कॅमेरे बसवण्याची योजना आहे. कोचमध्ये प्रवेश बिंदू आणि सामान्य ठिकाणी दोन कॅमेरे बसवले जातील.

या हाय-टेक कॅमेऱ्यांची खास गोष्ट म्हणजे ते कमी प्रकाशातही उच्च दर्जाचे रेकॉर्डिंग करू शकतात आणि जलद हालचालीतही स्पष्ट फुटेज देऊ शकतात. यामुळे देखरेख व्यवस्था आणि सुरक्षेत लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. प्रवाशांची सुरक्षितता अधिक मजबूत करण्यासाठी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी १२ जुलै रोजी झालेल्या बैठकीत या प्रकल्पाला मान्यता दिली आहे.



उत्तर रेल्वेवर यशस्वी चाचणीनंतर हा निर्णय घेण्यात आला, जिथे प्रवासी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांकडून प्रकल्पाबद्दल अभिप्राय घेण्यात आला.

**प्रत्येक कोचमध्ये ४ कॅमेरे**

रेल्वे प्रत्येक कोचमध्ये ४ घुमट प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार आहे. कोचच्या प्रत्येक गेटवर दोन कॅमेरे असतील. याशिवाय प्रत्येक इंजिनमध्ये ६ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील. त्यांची स्थिती इंजिनच्या पुढील, मागील आणि दोन्ही बाजूंना असेल. इंजिनमधील लोकोच्या प्रत्येक केबिनमध्ये (पुढील आणि मागील) एक डोम कॅमेरा आणि दोन डेस्क माउंटेड

(पान २ वर)